बीड । बुधवार
१९.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३४०
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955





# छावा चित्रपट पाहिल्यानंतर... नागपूर हिंसाचार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वक्तव्य





**मुंबई । प्रतिनिधी**

'छावा' चित्रपट पाहिल्यानंतर लोकांच्या भावना प्रज्वलित झाल्या आहेत.असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केलं आहे. सध्या औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा तापला आहे. नागपूरच्या महाल भागात सोमवारी रात्री मोठा हिंसाचार झाला. दोन गटांमध्ये तुफान दगडफेक झाली. हिंसक झालेल्या जमावाने रस्त्यावरील वाहनांची तोडफोड केली. वाहनांना आगी लावल्या. याप्रकरणी पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन राबवत जवळपास ५० जणांना घराघरातून ताब्यात घेतलं आहे. नागपूर शहरात आज तणावपूर्ण शांतता आहे. यावर विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'छावा चित्रपट पाहिल्यानंतर लोकांच्या भावना प्रज्वलित झाल्या आहेत. राड्यात ३३ पोलीस आणि ५ नागरिक जखमी झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विधानसभेत घडलेल्या घटनेवर वक्तव्य केलं आहे. नागपुरात झालेल्या राड्यानंतर देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'कुणी दंगा करण्याचा प्रयत्न केला तर कारवाई केली जाईल पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना सोडणार नाही.. राड्यात काही ठराविक घरं आणि अस्थापनांना लक्ष करण्यात आलं आहे. असं देखील मुख्यमंत्री म्हणाले.

विधनासभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेले महत्त्वाचे मुद्दे.

– हंसापुरी भागात दगडफेक झाली, तिथे अनेकांवर हल्ला करण्यात आला. –भालदारपुरा भागातही राडा झाला आहे. पोलिसांवर देखील हल्ला करण्यात आता आहे.

– नागपुरात काही ठिकाणी संचारबंदी लागू करण्यात आली आहे.

– पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना सोडणार नाही... असं देखील देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

नागपुरात झालेल्या राड्यानंतर ११ ठिकाणी संचारबंदी लागू करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला शांतता बाळगण्याच आवाहन केलं आहे. सोमवारी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल या हिंदुत्ववादी संघटनांनी राज्यभरात औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मुद्यावर आंदोलन केलं. नागपूरच्या महाल भागात अनियंत्रित जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. यामध्ये पोलीस देखील जखमी झाले आहेत. 'छावा' सिनेमाबद्दल सांगायचं झालं तर, सिनेमात अभिनेता विकी कौशल याने छत्रपती संभाजी महारांजांची भूमिका साकारली आहे. तर अभिनेता अक्षय खन्ना याने औरंगजेबाच्या भूमिकेला न्याय दिला आहे. सिनेमाने बॉक्स ऑफिसवर देखील बक्कळ कमाई केली. पण आता सिनेमामुळेच राज्यातील वातावरण तापलं आहे. असं अनेकांचं म्हणणं आहे.

# शिक्षकाच्या आत्महत्या मागचे गूढ उलगडले ? मुंडे पिता-पुत्रांवर गुन्हा

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षकाच्या आत्महत्येप्रकरणी सोमवारी (ता. १७) संस्थाचालक पिता- पुत्रावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष विक्रम बाबूराव मुंडे आणि अतुल विक्रम मुंडे (दोघेही रा. देवगाव, ता. केज) अशी गुन्हा नोंद झालेल्यांची नावे आहेत.



देवगाव (ता. केज) येथील धनंजय नागरगोजे हे विठ्ठलगड शिक्षण संस्थेच्या काळेगाव येथील आश्रमशाळेवर १८ वर्षांपासून शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांना आजतागायत वेतन नव्हते. त्यांनी वेतनाबाबत विक्रम मुंडे यांना विचारणा केल्यानंतर 'तू फाशी घे' असे उत्तर दिल्याचे आत्महत्येपूर्वी धनंजय नागरगोजे यांनी फेसबुक पोस्टमध्ये लिहिले आहे.

'यांच्या हातून हाल होऊन मरण्यापेक्षा स्वतः मेलेले बरे अशी पोस्ट त्यांनी ता. १४ मार्चला केली होती. दरम्यान, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी याबाबत उचित कार्यवाहीचे निर्देश समाजकल्याण अधिकाऱ्यांना दिले होते. सोमवारी (ता. १७) शिवसेनेचे आमदार अनिल परब आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधिमंडळाच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडच्या पोलीस उपनिरीक्षकाची महाराष्ट्र पोलीस अकादमीमध्ये आत्महत्या

**नाशिक । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील धोंडराई गावातील रहिवासी असलेले प्रशिक्षणार्थी पोलिस उपनिरीक्षक सोमेश्वर भानुदास गोरे (३२,रा. खोली क्र-१५५, दक्षिण वसतीगृह, एमपीए) यांनी महाराष्ट्र पोलीस अकादमीच्या आवारातील वसतीगृहाच्या राहत्या खोलीत सोमवारी (१७ मार्च) गळफास घेत आत्महत्या केली.

या घटनेने महाराष्ट्र पोलीस अकादमीच्या वर्तुळात खळबळ उडाली.



गोरे हे जानेवारी महिन्यापासून महाराष्ट्र पोलीस अकादमीत प्रशक्षिणार्थी पोलीस उपनिरीक्षक म्हणून प्रशिक्षण घेत होते. सोमवारी दुपारी ते प्रशिक्षण घेत असलेल्या १५ क्रमांकांच्या स्कॉडसह १३, १४ क्रमांकांच्या स्कॉडमधील प्रशिक्षणर्थींची उंटवाडी येथील बाल सुधारगृह भेटीचे आयोजन करण्यात आले होते. पाऊण वाजेच्या सुमारास ही भेट आटोपल्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थींना पोलीस नाईक चंद्रकांत पांडुरंग घेर (३२,रा.नेम. कवायत निर्देशक, एमपीए) यांनी वसतीगृहात सोडले. त्यानंतर दुपारी ▶▶ उर्वरित पान २ वर

# आजारी मित्राला भेटायला निघालेल्या तिघांचा अपघाती मृत्यू, मित्रानेही रुग्णालयात जीव सोडला



**लातूर । प्रतिनिधी**

आजारी मित्राला रुग्णालयात भेटण्यासाठी निघालेल्या तीन मित्रांचा अपघातात मृत्यू झाला आहे. टेम्पोने कारला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. याप्रकरणी टेम्पो चालकाविरोधात पोलिसांना गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लातूरच्या खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या मित्राला पाहण्यासाठी तीन मित्र पुण्याहून निघाले होते. मात्र मित्रांच्या कारला ढोकीजवळ आयशर टेम्पोने धडक दिली. यात कारमधील तिघांचाही मृत्यू झाला. दुर्दैवाची बाब म्हणजे ज्या आजारी मित्राला पाहण्यासाठी हे तिघे निघाले होते त्याचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. ▶▶ उर्वरित पान २ वर

# विकास बनसोडे हत्या प्रकरणातील आरोपींना फासावर लटकवा:पप्पू कागदे

## रिपाइं शिष्टमंडळ पोलीस अधीक्षकांना भेटले

**बीड । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात पिंपरी घुमरी येथे विकास बनसोडे या दलित युवकाची अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आली असून सदरील घटना माणुसकीला



काळिमा फासणारी आहे. त्यामुळे या प्रकरणात दोषी असलेल्या उर्वरित आरोपींना तातडीने अटक करण्यात यावी.आशा मागणीचे निवेदन रिपाइं शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक यांना सोमवार (दि.१७) मार्च रोजी दिले. दरम्यान विकास बनसोडे हत्या प्रकरणातील आरोपींना फासावर लटकवा अशीही मागणी युवा रिपाइं

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडच्या नाथापूरमध्ये हवेत गोळीबार, गावठी पिस्तुलासह तिघांना अटक

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील नाथापूर येथे धुलिवंदनाच्या दिवशी काही व्यक्तींनी हवेत गोळीबार केला होता. या प्रकरणी तिघांना अटक करून त्यांच्याकडून गावठी पिस्तूल, गोळीबार केलेल्या काडतुसाची पुंगळी जप्त केली. या प्रकरणी पिंपळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १४ मार्च रोजी रात्री दहा ते साडेदहा वाजेदरम्यान कोणीतरी हवेत गोळीबार केल्याची माहिती पिंपळनेर ठाण्याचे पोलिस निरीक्षक मधुसुदन यांना १५ मार्च



रोजी मिळाली होती. याची माहिती पोलिस अधीक्षक नवनीत यांना देऊन स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस उपनिरीक्षक सिद्धेश्वर, ग्रेड पोलिस उपनिरीक्षक तुळशीराम, पोह. राहुल, कैलास, मनोज व पिंपळनेर पोलिस ठाण्याचे अंमलदार अविनाश यांनी नाथापूर येथे जाऊन गोपनीय माहिती मिळविली. १४ मार्च रोजी रवी राधेश्याम वक्ते याच्या शेतात जेवणाची पार्टी होती. त्यावेळी त्याने साथीदाराकडील गावठी पिस्तुलामधून हवेत गोळीबार केल्याची खात्रीलायक ▶▶ उर्वरित पान २ वर




# 17 तासांचा प्रवास, 27 हजार किमी प्रतितास वेग; पहाटे साडेतीन वाजता परतणार पृथ्वीवर

**वृत्तसंस्था**

नासाचे अंतराळवीर सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांचा पृथ्वीच्या दिशेने प्रवास सुरू झालाय. नासा आणि इलॉन मस्क यांच्या स्पेस एक्सचे यान ड्रॅगनमधून आंतराळवीर परतणार आहेत. स्पेसक्राफ्टचे अनडॉकिंग झाले असून पृथ्वीच्या दिशेने प्रवास सुरू झालाय.

भारतीय प्रमाणवेळेनुसार सुनिता




विल्यम्स पहाटे ३ वाजून ३० मिनिटांनी पृथ्वीवर पोहोचेल. सुनिता विल्यम्ससह चारही अंतराळवीर परत येणार आहेत.

सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर गेल्या वर्षी जून महिन्यात आठवड्याभरासाठी अंतराळात गेले होते. मात्र गेल्या ८ महिन्यांपासून ते अडकून पडले होते. नासा आणि स्पेसएक्सने दोघांना परत आणलं. त्यांच्यासोबत इथर दोन अंतराळवीरही असणार आहेत. नासाने सुनिता विल्यम्स यांच्या परतीच्या प्रवासाचे शेड्युत जारी केलंय. शेड्युल ठरलेलं असतं तरी हवामानामुळे किंवा इतर गोष्टींमुळे यात बदलही होऊ शकतो. जवळपास १७ तासांचा हा प्रवास असणार आहे.

सुनिता विल्यम्सना घेऊन येणारं ड्रॅगन यानाची सकाळी १० वाजून ३५ मिनिटांनी अनडॉकिंग ▶▶ उर्वरित पान २ वर




सर्वांना नमस्कार,! तुमच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.

आपले दैनिक मराठवाडा पत्र येत्या ३० मार्च २०२५ ला चार वर्ष पूर्ण करत असून पाचव्या वर्षामध्ये पदार्पण करत आहे . गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. दैनिक मराठवाडा पत्रच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक ३० मार्च २०२५ ला आम्ही विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेष अंकामध्ये तुमच्या प्रतिक्रिया आमच्या पुढील कार्यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आपणं आपल्या प्रतिक्रिया दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत खालील ई-मेल व मोबाईल नंबरवर पाठवाव्यात. दैनिकाबद्दल आपली प्रतिक्रिया व फोटो पाठवावा हि विनंती.

मो.क्र. ९८२२१५२९५५, Email-dailymarathwadapatra2021gmail.com
वरील नंबर व ई-मेलवर प्रतिक्रिया पाठवाव्यात.

# शिवप्रभू आचरणातही दिसावेत !

तिथीनुसार शिवजयंती नुकतीच पार पडली. त्याआधी १९ फेब्रुवारीला तारखेनुसार शिवजयंती साजरी करण्यात आली. तारखेनुसार आणि तिथीनुसार तितक्याच जल्लोषात जयंती साजरी केले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज हे जगाच्या पाठीवरील एकमेव राजे आहेत. आपल्या अफाट बुद्धीचातुर्याने आणि अतुल पराक्रमाने पाच पातशाह्यांना शहा देणाऱ्या. कडे- कपाऱ्यांतील म ावळ्यांचे संघटन उभारून हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या महापराक्रमी, महाबली शिवरायांचा वारसा महाराष्ट्राला लाभला हे महाराष्ट्राचे परमभाग्यच म्हणावे लागेल. शिवरायांची कीर्ती आज सातासमुद्रापलिकडे पोहोचली आहे. जगातील अनेक विद्यापीठांमधून आज शिवरायांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या आदर्श राज्यकारभाराचा इतिहास शिकवला जात आहे.



महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात. चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मि ळतात. गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे किचैन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ होत चालली आहे. शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रती प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत असतानाचे चित्र आज दिसत आहे. ट्रेन-बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर सर्रासपणे करताना आढळतात. गाड्यांवर लावण्यात आलेले महाराजांच्या प्रतिमेचे अथवा नावाचे स्टिकर म्हणजे खुद्द महाराजच आहेत या भावाने त्याची नियमितपणे स्वच्छता करणारे शिवभक्तही तुलनेने कमीच आहेत. स्वतःला शिवभक्त म्हणवून घेणारे अनेक जण रस्त्यावर वाहतूक पोलिसांशी किंवा अन्य वाहनचालकाशी अरेरावी करताना किंवा वाद घालताना दिसून येतात. गाडीवर लावलेल्या स्टिकरच्या रूपाने आपल्यासोबत महाराजही आहेत आणि त्यांचे आपल्या प्रत्येक कृतीकडे बारीक लक्ष आहे हा भाव आपल्यात का निर्माण होत नाही ? जेव्हा आपण आपल्या गाडीवर महाराजांच्या प्रतिमेचे स्टिकर लावतो, गळ्यात शिवप्रतिमा परिधान करतो, कपाळावर चंद्रकोर लावतो आणि महाराजांसारखी दाढी मिशी ठेवतो तेव्हा या सर्वांसोबत आपली जबाबदारीही वाढते हे लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टीविषयी आपल्याम ध्ये तितकेसे गांभीर्य नसले, तरी समाज आपल्याकडे शिवभक्त म्हणून आदराने पाहतो हे ध्यानात ठेवायला हवे. त्यामुळे आपल्या प्रत्येक कृतीमधून शिवरायांच्या शिकवणुकीचा आदर्श दिसून यायला हवा. उपरोक्त गोष्टी परिधान करून आपण कार्यालयांत भ्रष्टाचार करत असू, गाडीवर महाराजांचे स्टिकर लावून वाहतुकीचे नियम पळत नसू, इतरांशी विनाकारण वाद घालत असू, घरी आई वडिलांचा आदर करत नसू, मुखातून अपशब्द उच्चारात असू तर समाज आपल्याकडे हीन दृष्टीने पाहिलच शिवाय प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचाही आपल्याकडून अवमान घडेल हे लक्षात घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेव्हढे सोपे आहे तेव्हढेच कठीण शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा !

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

# सुनीता विल्यम्स यांचा परतीचा प्रवास सुरू,

## जाणून घ्या 'ड्रॅगन क्रू' पृथ्वीच्या कक्षेत कसे उतरणार?



भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बॅरी (बुच) विल्मोर लवकरच पृथ्वीच्या कक्षेत परतणार आहेत. याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. जून २०२४ मध्ये बोईंगच्या स्टारलाइनर अंतराळयानातून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर केवळ आठ दिवसांच्या मोहिमेसाठी दोघांनी अवकाशात झेप घेतली होती. मात्र तांत्रिक अडचणी आणि हवाम ानातील बदलामुळे ते गेले ९ महिन्यांहून अधिक काळ अंतराळात अडकून होते. आता 'नासा'ने दिलेल्या माहितीनुसार सुनीता विल्यम्स यांच्यासह आणि इतर दोन क्रू-९ सदस्यांसह पृथ्वीवर लवकरच परतणार आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात अडकलेल्या नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना घेऊन स्पेसएक्स कॅप्सूल पृथ्वीवर रवाना होण्यासाठी निघाले आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर बुधवारी (दि.१९) भारतीय वेळेनुसार पहाटे ३:२७ वाजता पृथ्वीच्या कक्षेत परतणार आहेत. सुनीत विल्यम्स आणि इतर तीन अंतराळवीरांना आज मंगळवारी (दि.१८) सकाळी आयएसएसमधून अनडॉक केले आहे. अंतराळवीरांचा हा प्रवास १७ तासांचा असणार आहे. ते फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर उतरतील, असे देखील नासाने म्हटले आहे.

सुनीता विल्यम्स आणि सहकार्यांना घेऊन पृथ्वीवर परतणारे कॅप्सूल मंगळवार १८ मार्च रोजी भारतीय वेळेनुसार सकाळी १० वाजून ३५ मिनिटांनी डॉकिंग प्रक्रियेने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापासून वेगळे करण्यात आले आहे. यानंतर बुधवारी (दि.१९) पहाटे २ वाजून ४१ मिनिटांनी अंतराळयांनाता पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश होईल. पहाटे ३ वाजून २७ मिनिटांनी स्प्लॅशडाऊन म्हणजेच अंतराळयान समुद्रात उतरण्याची प्रक्रिया होईल. दरम्यान, मिशन मॅनेंजर्स परिसरातील हवामामन परिस्थितीचे निरीक्षण करत राहतील. हवामान, समुद्राची परिस्थिती आणि इतर घटकांचा परिणाम अंतराळयान लॅंडिंगवर होतो. स्पेसएक्स ड्रॅगन क्रू कॅप्सूल'ची आतापर्यंतची कामगिरी- सुनीता यांना आणण्यासाठी नासाने स्पेसएक्सचे ड्रॅगन क्रू कॅप्सूल निवडले आहे. हे कॅप्सूल त्याच्या निर्मितीपासून ४९ वेळा प्रक्षेपित करण्यात आले आहे. ड्रॅगन कॅप्सूलने ४४ वेळा आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात प्रवास केला आहे. ते २९ वेळा पुन्हा अंतराळातून सुरक्षित परतले आहे.

एका आठवड्याचा प्रवास नऊ म हिन्यांत बदलला- नासाच्या मोहिमेचा भाग म्हणून सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी गेल्या वर्षी ५ जून २०२५ रोजी बोईंग अंतराळयानातून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर उड्डाण केले. त्यांना तिथे फक्त एक आठवडा थांबायचे होते; पण अंतराळयानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ते दोघेही पृथ्वीवर परतू शकले नाहीत. त्या दोघांसाठी, १० दिवसांचे मिशन ९ महिन्यांहून अधिक काळाच्या प्रतीक्षेत बदलले.

पान १ /४ वरून पुढे...

### शिक्षकाच्या आत्महत्या...

अधिवेशनातही हा मुद्दा उपस्थित केला.त्यानंतर याप्रकरणी गुन्हा नोंद करण्याचे आश्वासन गृह राज्यमंत्र्यांनी दिले होते. समाजकल्याण विभागाचे कार्यालयीन अधीक्षक श्रीकांत घुले यांनी याबाबतसोमवारी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. यावरून विक्रम मुंडे आणि अतुल मुंडे या दोघांसह इतर तिघे अशा पाच जणांवर गुन्हा नोंद करण्यात आला.

### बीडच्या पोलीस...

साडेतीन वाजेच्या सुमारास स्कॉड फॉलिंग घेण्यात आले. स्कॉड कॉरपरेर भरत नागरे यांनी घेर यांना कळविले की, प्रशिक्षणार्थी गोरे हे फॉलिंगला हजर राहिलेले नाहीत. त्यानंतर त्यांनी स्कॉड मार्च करून गोरे राहत असलेल्या दक्षिण वसतीगृह खोली क्र-१५५ गाठली. तेथे खिडकीतून आतमध्ये डोकावून बघितले असता ते गळफास घेतलेला असल्याचे आढळून आले, अशी खबर घेर यांनी गंगापूर पोलिसांना कळवली. घटनेची माहिती मिळताच गंगापूर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन गोरे यांचा मृतदेह खाली उतरवून पंचनामा करत शवविच्छेदनासाठी सायंकाळी शासकीय जिल्हा रूग्णालयात पाठवला. याप्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी पुढील तपास हवालदार किशोर पगार हे करीत आहेत.त्यांच्या पश्चात आई, वडील दोन भावंडं असा परिवार आहे.

### आजारी मित्राला...

चौघेही लातूरच्या रेणापूर तालुक्यातील कामखेडा येथील रहिवासी होते. यामुळे कामखेडा गावावर शोककळा पसरली आहे. कामखेडा येथील रहिवासी असलेले लिंबराज वाघमारे (वय ३६ वर्षे) यांचा पुणे येथे चप्पल बनवण्याचा कारखाना होता. परंतु काही दिवसापूर्वी ते आजारी पडल्यामुळे ते गावी येऊन लातूरच्या खाजगी रुग्णालयात उपचार घेत होते. तर केशव वाघमारे, नितीन जटाळ, राम सुरवसे हे पुणे येथे वेगवेगळे व्यवसाय करत होते. त्यात केशव वाघमारे यांचा पुणे येथे चप्पल बनवण्याचा कारखाना होता. तर नितीन जटाळ यांचं लातूरमध्ये साई हॉटेल होतं. तर राम सुरवसे यांचं पुणे येथे सतूनचे दुकान होते. आपल्या आजारी पडलेल्या मित्राला पाहण्यासाठी हे पुण्यावरून लातूरच्या दिशेने निघाले. मात्र वाटेतच त्यांना मृत्यूने गाठलं. तर मित्रांची भेट न झालेल्या लिंबराज यांचंही उपचारदरम्यान रुग्णालयात निधन झालं. या दुर्दैवी घटनेने चारही मित्रांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला. याप्रकरणी टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### विकास बनसोडे...

प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केली. पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विकास बनसोडे हा दलित तरुण बोरगाव, ता.भोकरधन,जिल्हा जालना येथील आहे.गेल्या काही वर्षांपासून तो बीड जिल्ह्यातल्या, आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथे एका व्यक्तीच्या इथे ट्रक चालक म्हणून कामास होता. परंतू ट्रक मालकाने त्याला दोन दिवस बांधून ठेवून जबर मारहाण केली. त्यामध्ये त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर विकास बनसोडे हत्या प्रकरणात दहा जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. परंतू त्यापैकी फक्त सहा आरोपी अटक आहेत. उर्वरित आरोपींना तातडीने अटक करावी.बीड जिल्ह्याची एकंदरीत कायदा सुव्यवस्था लक्षात घेता, या प्रकरणात मयत विकास बनसोडे याच्या नातेवाईकांनी प्रकरण लावून धरल्याने मयताचे पोस्ट मार्टम छत्रपती संभाजी नगर येथे इन कॅमेरा झाले आहे. विकास बनसोडे यास अमानुषपणे मारहाण करुन त्याची हत्या करण्यात आली आहे. हा सर्व प्रकार सुनियोजित कट आहे.त्यामुळे आरोपींना फाशी देण्यात यावी. विकास बनसोडे हत्या प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावे.

### बीडच्या नाथापूरमध्ये...

माहिती मिळाली. त्यावरून पथकाने संशयित अजय अण्णासाहेब साबळे (रा. शिदोड), रवीं राधेश्याम वक्ते, महादेव सर्जेराव चव्हाण यांना ताब्यात घेत चौकशी केली. यात रवी वक्ते याने अजय साबळे याच्याकडील गावठी पिस्तुतामधून एक राउंड फायर केल्याची कबुली दिली.

या गुन्ह्यात वापरलेले गावठी पिस्तूल अजय साबळे याच्या घरी असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने दोन पंचांना बोलावून शिदोड येथे अजय साबळे याच्या घरातून ५० हजार रुपये किमतीचे लोखंडी गावठी पिस्तूल व आरोपींनी गोळीबार केलेल्या काडतुसाची रिकामी पुंगळी पोलिसांनी जप्त केली. या प्रकरणी तिघांवर पिंपळनेर पोलिस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम, भारतीय न्याय संहिता व महाराष्ट्र पोलिस अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस अधीक्षक नवनीत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन, उपविभागीय अधिकारी विश्वंभर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

### 17 तासांचा प्रवास...

प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यानंतर काही टप्प्यात अंतराळयानाचा परतीचा प्रवास होईल. अनडॉकिंगमध्ये स्पेसक्राफ्ट आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापासून वेगळं होईल.

### गोरगरीब जनतेची आर्थिक...

हातात घेतला जाणार नाही याची काळजी घ्यायला हवी मात्रमाजलगाव पोलीस जनतेला ही हलक्यात घेत असल्या मुळे माजलगाव पोलीस कुठेतरी राजकारण्याचे बटिक असल्याचे जाणवत आहे या बाबत आता पोलिसानी कुठे तरी सावध होऊन लाच खोरीला तिलाजली देऊन आम्ही खरे जनतेचे रक्षक आहोत हे दाखवून देण्याची गरज आहे माजलगावच्या मटक्याचा खटका कायमचा बसवा आणि गोरगरीब गरीब जनतेचा संसार वाचवा अशी आर्त हाक माजलगाव जनतेच्या वतीने व्यक्त होत आहे .

### स्थानिक स्वराज्य ...

असून त्यामध्ये सर्वांनी आपआपल्या कामाचा अहवाल घेऊन उपस्थित राहायचे आहे असे देखील अशोक पटवर्धन यांनी सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांना सांगितले. दि. १८ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या प्रम ुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत अशोक पटवर्धन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली. याबरोबरच बीड जिल्हा शिवसेनेची पुढील वाटचाल दिशा ध्येय धोरण सविस्तरपणे समजून सांगितले. यानंतर शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी महाराष्ट्र संपर्कप्रमुख किरण चव्हाण, युवसेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे आणि ऋषि जगताप यांचे वाढदिवसानिमित्त शुभेच्छा सत्कार करून बीड जिल्हा शिवसेनेच्या अभिष्टचिंतन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडी युवसेना शेतकरीसेना आजी माजी सरपंच पदाधिकारी लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

### वाहनचालकांसाठी...

सेवेची देखील तरतूद आहे.१. हेल्मेट - जर तुम्ही हेल्मेट न घालता रस्त्यावर दुचाकी चालवताना आढळला, तर थेट १ हजार रूपये दंड आकारला जाणार आहे. सोबतच ड्रायव्हिंग लायसन्स देखील तीन महिन्यांसाठी रद्द केलं जाणार आहे. यापूर्वी अशा चुकीसाठी शंभर रूपये दंड आकारला जात होता. तसेच जर कोणी दुचाकीवर तिघेजण प्रवास करत असाल तर १ हजार रूपये दंड द्यावा लागणार आहे.२. सीट बेल्ट - सीट बेल्ट न लावता गाडी चालवताना पकडल्यास १ हजार रुपये दंड आकारला जाईल. यापूर्वी यासाठी १०० रुपयांची तरतूद होती. तुम्ही जर सिग्नल मोडला तर तुम्हाला आता ५०० रूपयांऐवजी ५ हजार रूपये दंड भरावा लागणार आहे.३. मोबाईलवर बोलणे - जर तुम्ही गाडी चालवताना मोबाईलवर बोलत असाल तर तुमच्याकडून पुढील दीड वर्षाच्या रिचार्जच्या रकमेइतका दंड वसूल केला जाईल. यासाठी देखील आता ५०० रूपयांऐवजी ५००० रूपये दंड वसूल केला जाणार आहे.४. वेगात वाहन चालवणे - रस्त्यावर निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन चालविल्याबद्दल ५ हजार रुपये दंड आणि स्टंट केल्यास किंवा धोकादायकपणे वाहन चालविल्याबद्दल ५ हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे.५. दारू पिऊन गाडी चालवणे - दारू पिऊन गाडी चालवत असेल तर १०,००० रुपये दंड किंवा ६ महिने कारावासाची तरतूद आहे. दुसऱ्यांदा असे करताना आढळल्यास, १५,००० रुपयांपर्यंत दंड किंवा २ वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो.६. रस्ता अडवला तर - जर कोणी रुग्णवाहिका सारख्या आपत्कालीन सेवांचा मार्ग अडवला तर त्याला १०,००० रुपये दंड भरावा लागेल.७. कागदपत्रे - जर तुमच्याकडे ड्रायव्हिंग लायसन्स नसेल तर ५०० रुपयांऐवजी ५००० रुपये देण्यास तयार रहा. जर तुम्ही विम्याशिवाय गाडी चालवत असाल तर तुम्हाला २००० रुपये दंड किंवा तीन महिन्यांची तुरुंगवास होऊ शकतो. तुम्हाला सामुदायिक सेवा देखील करावी लागू शकते, जसे की काही दिवस ट्रॅफिक सिग्नलवर उभे राहून पोलिसांना मदत करणे. जर तुमच्याकडे प्रदूषण प्रमाणपत्र नसेल तर १० हजार रुपये देण्यास तयार रहा. एवढेच नाही तर ६ महिने तुरुंगवास आणि सामुदायिक सेवेचीही तरतूद करण्यात आली आहे. तथापि, खिशात कागदपत्रे बाळगण्याची गरज नाही. ते मोबाईलवर असले तरी चालेल.८. मुले आणि वाहने - जर तुम्ही १८ वर्षांपेक्षा कमी वयाचे असाल आणि गाडी चालवताना आढळलात तर तुम्हाला ३ वर्षांचा तुरुंगवास आणि २५,००० रुपये दंड होऊ शकतो. यासोबतच त्या वाहनाची नोंदणी देखील १ वर्षासाठी रद्द केली जाईल. वयाच्या २५ व्या वर्षापर्यंत ड्रायव्हिंग लायसन्स दिले जाणार नाही.

### अठरापगड जातींना...

देण्यासाठी पुढाकार घेणारा नेता म्हणून पवार साहेबांची ओळख आहे,नामांतरांच्या वेळेला राजकीय किंमत मोजावी लागली तरी चालेल परंतु मराठवाडा विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचे काम पवार साहेबांनी केले आहे, पवार साहेब नेहमीच पुरोगामी विचार जोपासणारा नेता आहे अशा नेत्याच्या नेतृत्वाखाली आपण सर्व सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करतो, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये देखील वंचित समाजाला प्रतिनिधित्व देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष करणार असल्यास मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले,

### छत्रपती शिवाजी महाराजांचा...

समावेश करणे आवश्यक आहे. त्या मधून येणाऱ्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र आणि कार्याची माहिती मिळेल. त्यातून धैर्यवान कृतिशील आणि चारित्र्यसंपन्न अशी पिढी निर्माण होणार आहे. या सर्व गोष्टीचा विचार करून बीड शहर सार्वजनिक शिवजन्म ोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. सत्येंद्र पाटील सरांनी शिवजन्म ोत्सवाच्या पवित्र व्यासपीठावरून हा विचार मांडला. प्रा. पाटील सरांच्या या विचाराला आज चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. प्रा. पाटील सरांनी उभ्या केलेल्या या चळवळीस बीड जिल्ह्यातील मुख्याध्यापकांनी मंगळवार दिनांक १८ रोजी बीड शहरातील सौ के एस के महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत पाठिंबा देऊन छत्रपतींचा जाज्वल्य इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची एकमुखी मागणी केली. शिवाय म ागणी मान्य होईपर्यंत आणि स्वस्थ बसणार नाही असा निर्धार उपस्थित मुख्याध्यापकांनी यावेळी व्यक्त केला. या प्रसंगी बीड जिल्ह्यातील मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# गट विकास अधिकाऱ्यांनी स्थापन केलेली 'चौकशी समिती' चौकशीतून गेली पळून

**गेवराई । प्रतिनिधी**

भडंगवाडी येथील ग्रामपंचायत अंतर्गत रोहयोच्या बोगस व नियमबाह्य झालेल्या कामाची चौकशी करणे बाबत दिलेल्या अर्जावर ०३ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील चठएत्रड्ड उपजिल्हाधिकारी यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत )जिल्हा परिषद बीड, गटविकास अधिकारी प.स. गेवराई यांना पत्रव्यवहार करुण उचित कार्यवाही करणे बाबत पत्र व्यवहार झालेला असल्याने दिनांक ०६ फ ेब्रुवारी .संजीव चोपडे.उप अभियंता बा. उप विभाग व सासवडे,शाखा अभियंता , जगताप तांत्रिक सहाय्यक लोणकर सहाय्यक यांना पत्र देऊन वदक तांत्रिक सहाय्यक प्रस्तुत कार्यालय ,सरपंच/ग्राम सेक रोजगार सेवक , अर्जदार बाळू तोडेकर यांना चौकशी करणे कामी पत्रव्यवहार करून गट विकास अधिकारी यांनी चौकशीची तारीख निश्चित करून दिलेली नसल्याने घात पातास अप्रत्यक्ष संधीच दिल्याची शक्यता नाकारता येत नाही. गट विकास अधिकारी कांबळे यांनी नव्याने पत्र काढून तक्रारीत तथ्य नसल्याचे खोटे पत्र व्यवहार करून कनिष्ठा सह तक्रारदार यांची दिशाभूल केली . चौकशी समितीचे अधिकारी लोकसेवक गावात येत असल्याबाबत तक्रारदार यांना कोणताही लेखी पत्रव्यवहार जाणीव पूर्वक केला नसून तक्रारदार यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवत तक्रारदार यांची दिशाभूल करणारी चौकशी करण्याचा प्रयत्न केला परंतू सदरील प्रकार तक्रार दार यांच्या लक्षात येत असल्याचे समजताच सरपंच यांचे पुत्र किंचक राधाकीसन नवले व पुतणे रामेश्र्वर नवले व कैलाश विठ्ठल माखले यांनी माझ्यावरती जिवेमारण्याचा हल्हा करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला त्या वेळी गाव गुंड हाणमार करत असताना चौकशीसाठी आलेले अधिकारी सदरील प्रकरणाचा आनंद घेत होते त्याचवेळी BDO मॅडम यांचा फोन आला बाकी तुम्ही बघा म्हणत चौकशीचे कागदपत्र घेवुन कायद्याचे ज्ञान नसलेले अधिकारी हे गंभीर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सबंधित आलेले सर्व अधिकारी पळून गेले व त्या वेळी मी गेवराई पोलीस टेशन येथे जाऊन झालेला सर्व प्रकार सांगितला त्या वेळी संबंधितावर गुन्हा नोंद करण्यात आला त्या नंतर मी उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे उपचारासाठी दाखल झालो मात्र तेथील डॉक्टर यांनी मला जिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी पाठवले यासर्व घटनेतील जबाबदार अधिकारी यांच्या मोबाईलचे CDR काढण्यात यावे व भविष्यात माझा घातपात झाल्यास हाच माझा लेखी जबाब समजण्यात यावा. व भडंगवाडी ग्रामपंचायत अंतर्गत मनरेगा या योजने अंतर्गत २०२२-ते-२५ मधील सर्व कामाची जिल्हा स्तरीय समितीमार्फत इनकॅमेरा पोलीस संरक्षणात चौकशी करण्यात यावी.अशी मागणी ,पोलीस अधीक्षक

जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.बीड यांच्या कडे केली आहे तसेच संबंधित प्रकरणावर घेतलेल्या दखलीबाबत अर्जदार यांना न चुकता,न त्रास देता प्रतिलीपीत पत्रव्यवहार करावा. असे निवेदनद्वारे बाळू तोडेकर यांनी मंटले आहे

# पांडुरंग परमात्मा उदार अंतकरानाचा आहे-ह.भ.प तुकाराम महाराज करडकर

**बीड । प्रतिनिधी**



जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या बीज उत्सवानिमित्त खर्डेवाडी येथे श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा व त्रिदिवसीय कीर्तन म होत्सवातील तिसऱ्या दिवशीच्या किर्तन सेवेचे पुष्प गुंफताना करडकर महाराजांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा मागणी पर प्रकरणातील पुढील अभंग चिंतनास घेतला होता

हेचि दान देगा देवा
तुझा विसर न व्हावा

अभंगावर भाष्य करताना म हाराज म्हणाले की भगवंत हा उदार अंतकरणाचा आहे आपल्याला झेपेल मावेल एवढे दान तो देतो परंतु आपण आपल्या जीवनामध्ये सदवर्तन ठेवा ,भगवंताचे चिंतन करा, जगात भगवंताच्या भगवत भक्ती शिवाय दुसरे विचार मनात आणू नका या भगवंत भक्तीचे फळ म्हणून भगवंत आपल्या सर्व म नोकामना पूर्ण करतात पंढरपुरातील श्री रुक्मिणीवर पांडुरंग परमात्मा हा उदार अंतकरणाचा आहे असे अनमोल विचार आपल्या चिंतन रुपी सेवेमध्ये तुकाराम महाराज करडकर यांनी विशद केले

भक्ती करण्याचे वेगवेगळे प्रकार आहेत परंतु सर्वश्रेष्ठ भक्ती म्हणजे श्रवण भक्ती होय असेही महाराजांनी सांगितले . आपल्या जीवनात इतर भक्ती करण्याच्या साधनेमध्ये आपणास काही अडथळे येऊ शकतात परंतु सर्वात सोपी भक्ती म्हणजे श्रवण भक्ती होय .आपण होईल तेवढे भगवंताचे नामस्मरण करा आणि आपल्या परिसरातील गावातील नाम सप्ताह ,किर्तन महोत्सव, भागवत ग्रंथ महापुराण आदी ठिकाणी आपली हजेरी लावून श्रवण भक्ती करा याचे फळ आपल्याला भगवंत दिल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास देखील तुकाराम महाराज करडकर आळंदी देवाची यांनी विशद केले. किर्तन सेवेनंतर कळेकर परिवाराच्यावतीने विनोद कळेकर यांनी महाराज मंडळी यांचा सन्मान करण्यात आला

या बीज उत्सवानिमित्त त्रि दिवशी कीर्तन महोत्सवाच्या सांगता प्रसंगी खरडेवाडी , धावज्याचीवाडी, पांढरवाडी, चाकरवाडी, आगेवाडी, परळी, बीड, वांगी आधी ठिकाणाहून महाराज मंडळी व गायक मंडळी उपस्थित होते

# लिंबागणेश येथे छावा चित्रपट प्रदर्शित ; अनुष्का रणखांबच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराजांचा ईतिहास नविन पिढी पर्यंत पोहोचवला गेला पाहिजे या दृष्टिकोनातून बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे काल दि.१५ मार्च रोजी रात्री कु.अनुष्का शिवाजी रणखांब हिच्या वाढदिवसाच्या निमित्ताने छावा चित्रपटाचे आयोजन करण्यात आले होते. गावच्या प्रमुख चौकात मारोती मंदिरासमोर सोय करण्यात आली होती.चित्रपट सुरू करण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या





अर्धाकृती पुतळ्याला अभिवादन करुन अनुष्का हिचा वाढदिवस साजरा केला.यावेळी अनुष्काच्या कुटुंबियांनी तिचे औक्षण केले यावेळी डॉ.गणेश ढवळे, पत्रकार हरीओम क्षीरसागर, लेनाजी गायकवाड व ग्रामस्थ शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ईतिहास, भावना, उत्कटता, देशभक्ती,साहस दृष्ये यांचा सुरेख संगम साधला गेलेल्या अप्रतिम कलाकृती असलेल्या छावा चित्रपटात पहिल्यांदाच छत्रपती संभाजी महाराजांची ज्या क्रुर पद्धतीने औरंगजेबाने हत्या केली तो दुर्दैवी प्रसंग पाहताना अक्षरक्ष: काळजावर दगड ठेवून छत्रपती संभाजी महाराजांना दिलेली वेदना पाहुन हृद्य पिळवटून जाते. भावना अनावर होतात. या प्रसंगी महिला भगिनी, तरूण वर्ग छत्रपती संभाजी राजांची वेदना पाहुन अगदी ढसाढसा रडत होते. चित्रपटाच्या शेवटी शिवगर्जना आणि घोषणाबाजी करण्यात आली. म ुलीच्या वाढदिवसा निमित्ताने छावा चित्रपटाचे आयोजन करताना ग्राम ीण भागातील लोकांना गावातच चित्रपट पहाता यावा यासाठी अनावश्यक खर्च टाळुन गावात चित्रपटाचे आयोजन करण्यात आल्याचे अनुष्काचे वडील शिवाजी रणखांब यांनी सांगितले.

# अ.भा.गुर्जर देवसेनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी रतन गुजर व रेखाताई खटाने यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये अखिल भारतीय गुर्जर देवसेना संघटनेच्या निवडी संपन्न झाल्या या बैठकीतम ध्ये राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.भैरोसिंह गुर्जर, राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष भिमसिंह गुर्जर, राष्ट्रीय महासचिव अमरचंद्र बिरला गुर्जर यांच्या सुचनेवरुन महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रशांत पाटील यांच्या आदेशावरुन बीड जिल्हाध्यक्षपदी रतन गुजर व महिला विभागाच्या जिल्हाध्यक्ष रेखाताई खटाणे यांची नियुक्ती जाहिर करण्यात आली.

सदरील नियुक्तीच्या प्रसंगी रतन गुजर व रेखाताई खटाने यांना पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या व जिल्हाभर आपण समाज संघटन व समाजातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी संघटना सदैव आपल्या मागे उभी राहील असे सांगण्यात आले व शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी देवसेना संघटनेचे राष्ट्रीय सचिव डॉ.सहदेव महाराज शास्त्री, राज्यध्यक्ष प्रशांत पाटील, प्रदेश महासचिव उखाजी चौधरी, प्रदेश महासचिव रविंद्र पाटील, महाराष्ट्र क्राईम बुलेट न्युजचे संपादक मंगल पाटील, प्रा.लक्ष्मण बहिरवाळ, सुभाष खटाणे यांच्यासह असंख्य समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

# विनयभंगाच्या प्रकरणात अवघ्या २४ तासात चार्जशीट दाखल; तलवाडा पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील तलवाडा पोलिसांनी वेगवान आणि प्रभावी कारवाई करत विनयभंग प्रकरणातील आरोपी हरिनारायण ऊर्फ नारायण पांडुरंग कोकाट आणि सुग्रीव मदन पांढरे यांच्याविरोधात अवघ्या २४ तासांत दोषारोपपत्र दाखल केले. पोलिसांच्या या जलदगतीने घेतलेल्या निर्णयामुळे जिल्हाभरात त्यांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. १७ मार्च २०२५ रोजी पीडित महिलेने दोन्ही आरोपींविरोधात विनयभंगाची तक्रार नोंदवली. तक्रारीनुसार, आरोपींनी संगनमताने तिचा विनयभंग केला. तातडीने कारवाई करत तलवाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि विशेष तपास पथक स्थापन केले. प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ यांच्या म ार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील यांनी तपास हाती घेतला.

गुन्ह्याची नोंद होताच पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपींचा वेगाने शोध घेत त्यांना अटक करण्यात आली. अत्यंत काटेकोरपणे तपास करून १८ मार्च २०२५ रोजी दुपारी २ वाजता गेवराई न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

या विशेष कामगिरीत पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील यांच्यासह सपोनि सोमनाथ, स. फो. विठ्ठल, स.फौ. भगवान, पोह. नारायण, चालक पोना सुग्रीव आणि महिला अंमलदार मीना यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. वरिष्ठ पोलीस अधिकारी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी निरज यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. बीड जिल्ह्यातील हा पहिलाच गुन्हा आहे, जिथे महिलांवरील अत्याचार प्रकरणात केवळ २४ तासांत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या वेगवान आणि कठोर कारवाईबद्दल पोलिसांचे कौतुक होत असून, नागरिकांनी देखील पोलिसांच्या तत्परतेची प्रशंसा केली आहे.

## सोयाबीन खरेदीसाठी केंद्राकडे मुदतवाढीची मागणी: पणन मंत्री रावल

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारने मागील वर्षात देशात इतर राज्यांच्या तुलनेत ११.२१ लाख मेट्रिक टन इतकी सर्वाधिक खरेदी केली आहे. अजूनही सोयाबीन शिल्लक असल्याने केंद्र सरकारकडे मुदतवाढ मागितली असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधान परिषदेत दिली. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी नियम ९३ अन्वये मांडलेल्या सूचनेवर उत्तर देताना पणन मंत्री श्री.रावल यांनी महाराष्ट्रातील सोयाबीन खरेदीची सद्यस्थिती मांडली.

## जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ४८९/२०२५, CNR No. MHBI0200009222025**

**आशा सुभाष शेळके व इतर ३ वि. निरंक (मार्फत – अ‍ॅड. वाय. एस. टेकाडे)**

अर्जदार :- १. आशा भ्र. सुभाष शेळके, वय-४७ वर्षे, धंदा-शेती व घरकाम, रा. कामखेडा ता. जि. बीड २. आसाराम पि. सुभाष शेळके, वय-२६ वर्षे, धंदा-शेती, रा. कामखेडा ता. जि. बीड ३. पूजा पि. ज्ञानोबा जगताप, वय-२३ वर्षे, धंदा-मजुरी, रा. पालसिंगन ता. जि. बीड ४. सोजरबाई भ्र. विक्रम शेळके, वय-७० वर्षे, धंदा-घरकाम, रा. कामखेडा ता. जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.**

वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी या न्यायालयात मयत जालींदर रघुनाथ जगताप यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत **सुभाष विक्रम शेळके यांचा मृत्यु दिनांक ०५/०८/२०२४ रोजी** जे. जे. प्लस हॉस्पीटल, औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ही मयताचा मुलगा आहे व अर्जदार क्र. ३ ही मयताची विवाहित मुलगी व अर्जदार क. ४ हि मयताची आई आहे. तसेच मयताचे वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत सुभाष विक्रम शेळके यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय काम ाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक 'मराठवाडा पत्र' मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **प्रकरणातील पुढील तारीख १७/०४/२०२५**

आज दिनांक १७ माहे मार्च २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**सह दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

# वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी सर्वंकष वाळू धोरण: महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई । प्रतिनिधी**

वाळू तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सध्या राज्यात महसूल आणि पोलीस दलाकडून संयुक्त कारवाई करण्यात येते. परंतु राज्यात वाळू माफिया आणि वाळू तस्करीच्या घटना वाढतच आहेत. यासाठीच राज्य शासन सर्वंकष वाळू धोरण तयार करणार आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेमध्ये दिली.

विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे बोलत होते. यावेळी सदस्य प्रविण दरेकर, शशिकांत शिंदे, एकनाथ खडसे यांनी चर्चेम ध्ये सहभाग घेतला.

राज्यात वाळू माफियांना आणि वाळू तस्करांना संरक्षण मि ळणार नाही अशी ग्वाही देऊन मंत्री बावनकुळे म्हणाले की, गोदावरी खोऱ्यातील वाळू उपसाबाबत ७ दिवसात चौकशीकरून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. राज्य शासन नव्या वाळू धोरणाबाबत काम करत असून यानुसार आता एम सॅन्ड म्हणजेच दगडापासून तयार केलेल्या वाळूच्या वापरावर भर देण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वाळू क्रशर उभारण्यात येणार आहे. त्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान ५० ते १०० अशा प्रकारचे क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे वाळूची उपलब्धता वाढून सध्या वाळू पुरवठा आणि मागणीमध्ये असलेली तफावत दूर होणार आहे. त्यामुळे वाळू माफियांवर आपोआप नियंत्रण येईल. तसेच वाळू तस्करीबाबत महसूल व पोलीस अधिकारी यांना कारवाईचे समान अधिकार देण्याचाही वाळू धोरणामध्ये समावेश असणार आहे.

# शक्तीकुंज वसाहती जवळील रस्त्याचा पॅच तात्काळ दुरुस्त करा : अँड.मनोज संकाये

## राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नागरिक हैरान!

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी शहरातील थर्मल कॉलनी परिसरातील शक्ती कुंज वसाहती जवळील परळी गंगाखेड राष्ट्रीय म हामार्गाचे काम सुरू असून त्या महामार्गावर शक्ती कुंज वसाहतीजवळ पॅच सोडले आहेत. राष्ट्रीय महामार्गाचे सर्व अधिकाऱ्यांनी या कामाकडे दुर्लक्ष केले असून हा पॅच तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केली आहे. शक्ती कुंज वसाहती मध्ये भेल सेकंडरी इंग्लिश स्कूल, न्यू हायस्कूल तसेच थर्मल येथील अधिकाऱ्यांची निवासस्थाने



आहेत. या रस्त्यावरून रहदारी मोठ्या प्रमाणावर आहे. राष्ट्रीय महामार्ग परळी ते गंगाखेड काम चालू असल्याने याच ठिकाणी एक पॅच सोडण्यात आला आहे. त्यामुळे तेथील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. अनेक वाहनधारकांचे अपघात होत आहेत. विद्यार्थी तसेच नागरिक यांचेही अपघात होत असल्याने हा पॅच नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे त्यामुळे राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन हा सोडलेला पॅच तात्काळ दुरुस्त करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ४८८/२०२५**

**दैवशाला रविंद्र पडुळे वि. निरंक, (मार्फत– अ‍ॅड. वाय. एस. टेकडे)**

अर्जदार-१. दैवशाला भ्र. रविंद्र पडुळे, वय-३५वर्षे, धंदा-घरकाम, रा. माळापुरी ता. जि. बीड, २. गितांजली पि. रविंद्र पडुळे, वय-१४वर्षे, अज्ञान धंदा-शिक्षण रा. सदर, ३. नव्या पि. रविंद्र पडुळे, वय-०६वर्षे, अज्ञान धंदा-शिक्षण रा. सदर, ४. महेश पि. रविंद्र पडुळे, वय-०४वर्षे, अज्ञान धंदा-शिक्षण रा. सदर अ.पा.क. अर्जदार क्र. १ आई अर्जदार क्र. २ ते ४ साठी, ५.मंदाकिनी भ्र. अर्जुनराव पडुळे, वय-५६वर्षे, धदां-घरकाम, रा. सदर

गैरअर्जदार -निरंक

**प्रकरण– भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत रविंद्र अर्जुनराव पडुळे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत **रविंद्र अर्जुनराव पडुळे हे दिनांक ०३/०६/२०२४ रोजी जिल्हा रुग्णालय, बीड ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र.२ ते ३ या मुली आहेत तसेच अर्जदार क्र. ४ हा मुलगा आहे. व अर्जदार क्र. ५ ही आई आहे. यांच्या शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे रविंद्र अर्जुनराव पडुळे या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे रविंद्र अर्जुनराव पडुळे रा.माळापुरी ता.जि.बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील तारीख ०३/०५/२०२५.**

आज दिनांक १७/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

दैनिक
# मराठवाडा पत्र
epaper.marathwadapatra.com
बुधवार, दि.१९ मार्च २०२५ पान ४

## माजलगाव तालुक्यातील मटक्याचा घटका कधी बसणार ?
## गोरगरीब जनतेची आर्थिक लूट थांबणार कधी ?

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यात मटका नावाच्या ऑनलाईन जुगाराने थैमान घातले आहे यामुळे गोर गरीब मजुरांची मोठया प्रमाणात लूट होत आहे माजलगाव तालुक्यातील मटक्या चा खटका बसणार कधी आणि यातून होणारी गोर गरीब जनतेची लूट थांबणार कधी असा प्रश्न माजलगाव तालुक्यातील सर्व सामान्य जनता व्यक्त करत आहे. माजलगाव तालुक्यातील मटका बंद व्हावा या साठी पत्रकार संघ प्रयत्न करीत आहेत तरी तालुक्यातील मटका बंद करायला इथले पोलीस प्रसासन धजावत नाही म्हणजे मटक्या मागे खूप मोठे राजकारण दिसून येत आहे मात्र पोलीस हे समजू शकले नाहीत की जिथे गावाचा प्रश्न येतो तिथे राव काहीच करू शकत नाही माजलगाव पोलिसांनी जनतेच्या संयमाची वाट पाहू नये जाणते कडून कायदा ▶▶ उर्वरित पान २ वर

# चाळण झालेल्या प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नाही
# मात्र चांगल्या रस्त्यावरच दुबार काम
## नगरपालिकेचा मनमानी कारभार ; सोमवारी आंदोलनाचा ईशारा : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील अंतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने शहरातील बहुतांश रस्त्याची चाळण झालेली आहे. त्यामुळे वाहनचालकांना मुठीत जीव घेऊन कसरत करत वाहन चालवावे लागते. शहरातील सर्वाधिक वर्दळीचा असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज रस्त्याची पुर्ण चाळण झालेली आहे.या रस्त्यावर खड्डे,वाळु,वाळु मिश्रित खडी, असल्याने धुराळा उडत असुन



नागरीकांना श्वसनाचे आजार जडण्याचा धोका आहे.या रस्त्यांवरील खड्डे



बुजविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरीकांनी वारंवार नगरपरिषद प्रशासनाला केलेली आहे.मात्र नगरपरिषद प्रशासन दुरुस्तीसाठी निधी नसल्याचे रडगाणे गात आहे.मात्र याचवेळी प्रमुख रहदारीच्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्या ऐवजी नगरपालिकेने नगरपालिका कार्यालयासमोरील केवळ नगरपालिकेत येणाऱ्या वाहनांची वर्दळ असणाऱ्या आणि रस्त्यावर कुठेही खड्डे नसताना चांगल्या सुस्थितीत असलेल्या सिमेंट रस्त्यावरच पुन्हा दुबार सिमेंट रस्त्याचे काम केले आहे. त्यामुळे एकंदरीतच प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नसल्याचे कारण सांगणा-या नगरपालिका प्रशासनाने चांगल्या रस्त्यावरच दुबार रस्ता करून जनतेच्या पैशाची उधळपट्टी का केली ? ? हा प्रकार ठेकेदारांचे खिसे भरण्याचा प्रकार असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असून मुख्य रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्यात यावेत या मागणीसाठी सोमवारी या प्रकरणी नगरपरिषद कार्यालयावर लक्ष्यवेधी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कामाला लागा: अशोक पटवर्धन
## बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न



### एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा– जगताप, मुळूक गलधर

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्यांच्या मनातील आवडत नेतृत्व आहेत. कार्यकर्त्यांना जपणे त्यांना आधार देणे ही शिंदे साहेबांची सवय बनलेली आहे म्हणूनच शिंदे साहेबांच्या नेतृत्वात अवघ्या महाराष्ट्रभरात शिवसेनेची ताकद वाढत चालली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. आपल्या आगामी निवडणुकात संपूर्ण बीड जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा फडकवायचा असून आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात देखील आपल्याला बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागायाचे आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी आढावा बैठकीत अवाहन केले.**

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यामध्ये म हायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असून शिवसेना महायुतीचा एक भाग आहे. यामुळे आपण सर्वजण सत्तेत आहोत. या सत्तेचा लाभ जनते पर्यंत पोहचवा. काही महिन्यातच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे आतापासूनच तयारीला लागा असे नवनिर्वाचित शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांनी आढावा बैठकीत मार्गदर्शन केले. याबरोबरच पुढील महिन्यात पुन्हा एकदा तालुका निहाय बैठकीचे आयोजन करण्यात येणार ▶▶ उर्वरित पान २ वर

# खापरवाडी (रत्नापूर ) येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन
## क्रिकेट प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आयोजक दत्ता पटाईत यांचे आव्हान

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील खापरवाडी रत्नापूर या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा चषक खापरवाडी रत्नापूर २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे दि. २०/०३/२०२५ वार गुरुवार रोजी सकाळी नऊ वाजता रत्नापूर या ठिकाणी या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. तरी या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटक जयसिंग भैय्या सोळंके माजी सभापती जिल्हा परिषद बीड यांच्या हस्ते होणार आहे, या कार्यक्रमाला पंचक्रोशातील क्रिकेट प्रेमी उपस्थित राहावे, व या क्रिकेट संघातर्फे प्रथम बक्षीस खापरवाडी चे विद्यमान सरपंच सचिन लंगडे व उपसरपंच ऋषिकेश पटाईत यांच्यावतीने ३१ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे, दुसरे बक्षीस औदुंबर सावंत माजी जिल्हा परिषद सदस्य व आनंद काळे यांच्यावतीने १५ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे, व तिसरे बक्षीस डॉ,गणेश सुरवसे, यांच्यावतीने ७५०० च बक्षीस देण्यात येणार आहे, यामध्ये विशेष सहकार्य बजरंग बप्पा साबळे तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी, संभाजी तात्या शिंदे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी, विश्वास आगे माजी सरपंच देवडी, ज्ञानेश्वर सुरवसे माजी सरपंच देवगाव, गोविंद बादाडे उपसरपंच काडीवडगाव, ईश्वर पटाईत माजी ग्रामपंचायत सदस्य खापरवाडी, नितीन लंगडे, बब्रुवान इतापे



सचिव सेवा सहकारी सोसायटी, नितीन गोजे इंडियन आर्मी, रामहरी पटाईत गणेश पॅथॉलॉजी हे पाणी सेवा देणार आहेत, मॅन ऑफ द मॅच, साई राम बॅटरी वडवणी, बेस्ट बॅट्समन मुकुंद लंगडे हर्षद टायर्स माजलगाव, बेस्ट कीपर संग्राम चोरगे संग्राम मल्टी सर्विसेस खापरवाडी, मॅन ऑफ द सिरीज तानाजी आजबे इंजिनियर पंचायत समिती वडवणी, आयुष ट्रेडर्स चे मालक वैभव लंगडे ,बेस्ट बॉलर दादासाहेब गव्हाणे इंडियन आर्मी, यांच्या सर्वांच्या सहकार्याने व आयोजक क्रिकेट प्रेमी कमिटी यांच्यावतीने खापरवाडी रत्नापूर या ठिकाणी भव्य क्रिकेट स्पर्धा मोठ्या प्रमाणात उत्साहात पार पडणार आहे या कार्यक्रमाला या क्रिकेट प्रेमींच्या खेळाला वाव देण्यासाठी परिसरातील क्रिकेट प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने युवक बांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहण्यात यावे असे आव्हान आयोजक दत्ता पटाईत यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाहनचालकांसाठी महत्त्वाचे! सावधान रहा, अन्यथा तुम्हाला १० हजारांचा फटका बसलाच समजा

**बीड । प्रतिनिधी**

नवीन मोटार वाहन दंड २०२५ नुसार, वाहतूक नियमांचे पालन न केल्यास मोठा दंड आकारला जाईल. ड्रायव्हिंग लायसन्स आणि वाहन नोंदणी देखील रद्द केली जाऊ शकते.




तुम्हाला तुरुंगवास होऊ शकतो, तुम्हाला सामुदायिक सेवा देखील करावी लागू शकते. आता जर तुम्ही रस्त्यावर वाहतुकीचे नियम पाळले नाहीत तर तुम्हाला तीन नव्हे तर दहा पट दंड भरावा लागेल. कारण नवीन मोटार वाहन दंड २०२५ हा १ मार्च २०२५ पासून लागू झाला आहे. दंडाव्यतिरिक्त, तुरुंगवास आणि सामुदायिक ▶▶ उर्वरित पान २ वर

# अठरापगड जातींना सोबत घेऊन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढणार: राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सामाजिक न्याय विभागाची बैठक राष्ट्रवादी भवन बीड येथे पार पडली, यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रांत अध्यक्ष श्री पंडित कांबळे सर यांच्या उपस्थितीत बैठक बोलण्यात आली होती. यावेळी मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यातून



प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के असे म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हा आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचारधारेवर चालतो त्यांनी अठरापगड जातींना सोबत घेऊन त्यांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे, मराठवाड्याच्या विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव ▶▶ उर्वरित पान २ वर

## पीएम श्री.मा.शाळा पाली येथे आंतरराष्ट्रीय व्याख्यान संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

मौजे पीएमश्री माध्यमिक शाळा पाली येते आज दि.१७ मार्च २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय व्याख्यानकार डॉ.सतिश साळुंके सर यांचे बीड जिल्हा इतिहास संशोधनावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ.सतिश सोळुंके सरांनी बीड जिल्ह्यातील प्राचीन मंदिर, शिलालेख, किस्कींदा नदी, कंकालेश्वर मंदिर, धर्मापुरी मंदिर, किल्लेधारुर, वेरुळ लेणी, खजिना विहीर इत्यादी विषयी विस्तृत मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.लाड सर हे होते, कार्यक्रमास सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुंडे मनिषा यांनी केले.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास नवीन शैक्षणिक धोरणातील अभ्यासक्रमात समाविष्ट करा



## या मागणीसाठी प्रा. सत्येंद्र पाटील यांनी उभारलेल्या चळवळीस मुख्याध्यापकांचा उत्स्फूर्त पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय शिक्षण धोरण –२०२० या शैक्षणिक अभ्यासक्रमात छत्रपतींचा शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करा या मागणीसाठी शिक्षक नेते प्रा. सत्येंद्र पाटील यांनी छत्रपती शिवरायांच्या जयंती दिनापासून एक व्यापक चळवळ सुरू केली. या चळवळीला बीड जिल्ह्यातील मुख्याध्यापकांनी एकमुखी पाठिंबा दिला. शिवाय जोपर्यंत आपली मागणी मान्य होऊन नव्या शैक्षणिक अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी म हाराजांचा इतिहास समाविष्ट होत नाही. तोपर्यंत स्वस्थ बसणार नाहीत असा निर्धार मुख्याध्यापकांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रात सुराज्य निर्माण करावयाचे असेल नव्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास माहीत असला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यातून प्रेरणा घेऊन आमची नवी पिढी चारित्र्य संपन्न, बलवान आणि सामर्थ्यशाली बनली पाहिजे. त्यामुळे नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आखलेल्या अभ्यासक्रमामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्राचा ▶▶ उर्वरित पान २ वर

